मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## संरक्षण व सामिरकशास्त्र विभाग

## सायबर गुन्हे आणि सुरक्षा अहवाल

**दिनांक– ०६ ऑक्टो. २०२२**

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हे व सायबर सुरक्षा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा.श्री सुनील पाटील (एपीआय नाशिक) आदरणीय प्राचार्य डॉ पी व्ही रसाळ साहेब, उपप्राचार्य व संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग प्रमुख आर व्ही पवार, श्री विजय माळी(पीएसआय सिन्नर) श्री विजय बोराडे प्रा अरुण पोटे,प्रा दीपक खुर्चे आदी मान्यवर उपस्थित होते

याप्रसंगी प्रमुख वक्ते मा.श्री सुनील पाटील यांनी मनोगत म्हटले की सर्व देशांनी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने प्रगती केली आणि विविध क्षेत्रांमध्ये त्याचा उपयोग करून आपल्या सुख सुविधा पूर्ण केल्या परंतु याच तंत्रज्ञानाचा दुरुपयोग काही देश व व्यक्तींकडून होताना दिसून येतो यातूनच गुन्हे घडले जातात आज तंत्रज्ञानाच्या साह्याने वेगवेगळ्या प्रकारची गुन्हे गुन्हेगार कडून होतात यामध्ये बँक फ्रॉड मध्ये गुन्हेगार ग्राहकाला चुकीची माहिती देऊन त्याच्याकडून बँक अकाउंट नंबर व ओटीपी घेऊन त्याच्या खात्यातील सर्व पैसे काढून घेतो जॉब फ्रॉड मध्ये विविध प्रकारच्या लिंक चा उपयोग करून युवकांना जॉबची अपेक्षा लालच दाखवून त्यांच्याकडून फसवणूक केली महिला व बालक संबंधी गुन्हा यामध्ये महिलांना व बालकांना ब्लॅकमेल केले जाते तसेच फसवणूक करून त्यांच्याकडून अशील कृत्य करून घेतले जातात जाते एप्लीकेशन फ्रॉडमध्ये वेगवेगळ्या एप्लीकेशनचा उपयोग करून आपल्या लॅपटॉप व मोबाईल मधील सर्व माहिती काढून घेतली जाते गेम फ्रॉड विविध गेमच्या आधारे नागरिकांना काही भयानक कृत्य करण्यास भाग पाडले जाते यामध्ये त्या व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो ब्ल्यू वेल्स पब्जी या गेम द्वारे ही कृती होऊ शकते मॅट्रिमोनॉट फ्रॉड मध्ये गुन्हेगार वेगवेगळ्या तंत्रज्ञान सोशल मीडियाद्वारे लग्नाचे किंवा प्रेम संबंध घडवून आणले जातात आणि त्यामधून पैसे व इतर अशील गोष्टी करण्यास भाग पाडले जाते मॉरफिंग फ्रॉडमध्ये डुबलीकेट अकाउंट फेसबुक इंस्टाग्राम वर तयार करून फसवणूक केली जाते यात चेहरा इतर भागात बदल केला जातो अशा वेगवेगळ्या फ्रॉड बाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली त्याचबरोबर काही उपाययोजना सांगितल्या यामध्ये आपला ओटीपी, बँक अकाउंट नंबर, आपली व्यक्तिगत माहिती किंवा काही

फोटो कोणालाही देऊ नये किंवा सोशल मीडिया वरती शेअर करू नये या सर्व अकाउंटला स्ट्राँग पासवर्ड चा उपयोग करावा असे त्यांनी आपल्या मनोगतात

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ पी व्ही रसाळ म्हटले की विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग शैक्षणिक क्षेत्रामध्ये कशाप्रकारे केला जाऊ शकतो व तंत्रज्ञानाचा दूरउपयोग झाल्यास कोणत्या गुन्ह्यांना सामोरे जावे लागते याबाबत माहिती दिली. प्रास्ताविकात उपप्राचार्य व संरक्षण शास्त्र विभाग प्रमुख आर व्ही पवार यांनी सायबर गुन्हे व सायबर सुरक्षा या कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले

यावेळी कॉन्स्टेबल श्री बिपिन चौधरी श्री सुनील ढोकरट श्री आकाश अंबोरे श्री आकाश मोरे श्री एस बी झाडे तसेच बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी कार्यक्रमासाठी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा दीपक खुर्चे यांनी केले तर आभार प्रा अरुण पोटे यांनी मानले.